## संक्षिप्त अनुक्रमणिका


卐 ग्रंथाच्या संकलकांचा परिचय ५

卐 आध्यात्मिक परिभाषेतील प्रस्तावना ! ७

卐 मनोगत १०

卐 आरती करण्याचे महत्त्व काय ? १२

卐 सकाळी अन् सायंकाळी आरती का करावी ? १५

卐 आरती करण्याची संपूर्ण कृती १६

卐 आरतीच्या पूर्वी शंख का व कसा वाजवावा ? २१

卐 आरती योग्य उच्चारांसह का म्हणावी ? ३०

卐 आरतीच्या वेळी टाळ्या अन् वाद्ये हळूवार का वाजवावीत ? ३३

卐 देवाला ओवाळण्याची योग्य पद्धत कोणती ? ३९

卐 आरती ग्रहण करण्याची योग्य पद्धत कोणती ? ४६

卐 आरतीनंतर प्रदक्षिणा का घालावी ? ४८

卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य ६१

# मनोगत

उपासकाला हृदयातील भक्तीदीप तेजोमय करण्याची आणि देवतेकडून कृपाशीर्वाद ग्रहण करण्याची सुलभ पर्वणी म्हणजे 'आरती'. संतांच्या संकल्पशक्तीने सिद्ध असलेल्या आरत्या म्हटल्याने वरील उद्देश निःसंशय सफल होतात, पण तेव्हाच जेव्हा आरत्या हृदयातून, म्हणजेच आर्ततेने, तळमळीने आणि अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्य रीतीने म्हटल्या जातात.

एखादी गोष्ट आपल्याकडून आर्ततेने, म्हणजे अंतःकरणपूर्वक तेव्हाच होते, जेव्हा तिचे महत्त्व आपल्या मनावर बिंबते. त्या गोष्टीमागील शास्त्र वा सिद्धान्त सांगितल्यास तिचे महत्त्व लवकर पटते. याच उद्देशाने या लघुग्रंथात आरती करतांना करावयाच्या विविध कृतींमागील अध्यात्मशास्त्र दिले आहे. उपासना करतांना कोणतीही कृती अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्य करणे अत्यावश्यक असते; कारण अशा कृतीचेच परिपूर्ण फळ मिळते. देवाला आरती ओवाळतांना ती देवाच्या अनाहत ते आज्ञा चक्रापर्यंत ओवाळावी, आरतीच्या वेळी टाळ्या

हळुवारपणे वाजवाव्यात, आरतीनंतर प्रदक्षिणा आवर्जून घालाव्यात, यांसारख्या गोष्टी बहुतेकांना ठाऊक नसतात किंवा त्यांच्याकडून त्या अयोग्यरित्या होत असतात. या लघुग्रंथामुळे सर्वच कृती अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्यरित्या कशा करावयाच्या हे कळेल.

या लघुग्रंथात दिलेले शास्त्र जाणून त्यानुसार आरती करून प्रत्येकाची अधिकाधिक भावजागृती होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

**धार्मिक कृतींमागील शास्त्र सांगणारा सनातनचा लघुग्रंथ!**

# देवघर आणि पूजेतील उपकरणे

**(शास्त्रीय महत्त्व आणि मांडणी)**



- देवघर पूर्व-पश्चिम दिशेला का असावे ?
- देवघरात देवतांची मांडणी कशी करावी ?